नि.फौ.ख.क्र. १९४/२०२३

सरकार –वि– राहुल चौधरी

नि.क्र. ३०५

**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ११ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव – सागर धनराज बराटे,

वय २२ वर्षे, व्यवसाय – चालक,

निवासस्थान – बामनुद, ता. यावल, जिल्हा – जळगाव.

**सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती एस. व्ही. इंगळे, सरकारी वकील.**

१. दिनांक ११.०५.२०२३ रोजी पोलीस स्टेशन शेगाव ग्रामीण येथे माझ्या समक्ष जप्ती पंचनामा करण्यात आला नव्हता. मी सही केली होती. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी पंच क्र. १ म्हणून सही आहे. त्यातील मजकूर मला माहिती नाही. त्याला सहीपुरता **नि.क्र.३०६** देण्यात येते.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे, सरकारी वकीलांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली, परवानगी देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ११.०५.२०२३ रोजी मी पोलीस स्टेशन शेगाव ग्रामीण येथे पंच म्हणून हजर होतो व त्यावेळेस माझ्या सोबत दुसरा पंच रवी शेळके हजर होता. हे म्हणणे खरे आहे की, जप्ती पंचनामा पोलीस निरीक्षक दिलीप वडगावकर यांनी माझ्या समक्ष तयार केला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष आरोपी क्र. ५ हिच्याकडून एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल जप्त करण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, सॅमसंग मोबाईल जप्त करुन माझ्या समक्ष जप्ती पंचनामा तयार करण्यात आला होता व मी त्यावर वाचून समजून सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, सर्व आरोपींना मी ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींच्या सांगण्यावरुन त्यांना शिक्षेपासून वाचविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपी क्र. १, ५ व ६ तर्फे श्रीमती कुमकुले व श्री. जी. व्ही. पिसे, वकील यांनी नाकारला. आरोपी क्र. २ ते ४ चे विधीज्ञ गैरहजर. आरोपी क्र. २ ते ४ यांनी साक्षीदाराला काहीही विचारायचे नसल्याचे सांगितल्यामुळे आरोपी क्र. २ ते ४ यांच्या तर्फे उलटतपास नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| (एन. डी. मेश्राम ) | (एन. डी. मेश्राम ) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.०९.०९.२०२५ | दि.०९.०९.२०२५ |

नि.फौ.ख.क्र. १९४/२०२३

सरकार –वि– राहुल चौधरी

नि.क्र. ३०७

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक १२ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव — अरविंद माणिकसा सोनोने,

वय ५८ वर्षे, व्यवसाय — मजुरी,

राहणार — सुवर्ण नगर, बुलडाणा, ता. जिल्हा – बुलडाणा.

**<u>सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती एस. व्ही. इंगळे, सरकारी वकील.</u>**

१. दिनांक २०.०६.२०२३ रोजी आर्थिक गुन्हे शाखा, बुलडाणा येथे माझ्या समक्ष जप्ती पंचनामा करण्यात आला नव्हता. मी सही केली होती. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी पंच क्र. १ म्हणून सही आहे. त्यातील मजकूर मला माहिती नाही. त्याला सहीपुरता **<u>नि.क्र.३०८</u>** देण्यात येते.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे, सरकारी वकीलांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली, परवानगी देण्यात आली.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २०.०६.२०२३ रोजी मी आर्थिक गुन्हे शाखा, बुलडाणा येथील कार्यालयात हजर होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस माझ्या सोबत दुसरा पंच संजय अहीर होता. जप्ती पंचनामा सहाय्यक पोलीस निरीक्षक मधुसुदन घुगे यांनी केला होता की काय हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष महिंदा एम्स.यु.व्ही. ५०० जप्त केली होती. हे म्हणणे खरे नाही की, जप्ती पंचनामा तयार करुन तो मला वाचून दाखविला व मी त्यावर वाचून समजून सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी सर्व आरोपींना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना ओळखत असल्यामुळे त्यांना शिक्षेपासून वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>उलटतपास आरोपी क्र. १, ५ व ६ तर्फे श्रीमती कुमकुले व श्री. जी. व्ही. पिसे, वकील यांनी नाकारला. आरोपी क्र. २ ते ४ चे विधीज्ञ गैरहजर. आरोपी क्र. २ ते ४ यांनी साक्षीदाराला काहीही विचारायचे नसल्याचे सांगितल्यामुळे आरोपी क्र. २ ते ४ यांच्या तर्फे उलटतपास नाही.</u>**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| (एन. डी. मेश्राम ) | (एन. डी. मेश्राम ) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.०९.०९.२०२५ | दि.०९.०९.२०२५ |